ठाणे, मंगळवार दि. ३० जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ९२ पाने : ६, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**जगमोहन यांची राजकीय भूमिका**

केंद्र आणि राज्यातील राजकीय समीकरणे पाहता भाजप चंद्राबाबूंना साथ देत आहेत असेच दिसते. स्वतःचे अस्तित्व राखण्यासाठी आंध्र प्रदेशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या वाय.एस.आर. .......पान ४ वर



UPSC नंतर आता MPSC मधील दिव्यांग कोटा रडारवर .......पान ३ वर

## आता ज्येष्ठ नागरिकांसाठी ही कल्याणकारी महामंडळ



**मुंबई – ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणे हे शासनाचे कर्तव्य आहे. या भूमिकेतून आमचे काम सुरु असून येत्या काळात ज्येष्ठांसाठीच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कर्तव्य अभियान राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महामंडळाची स्थापन करण्याची घोषणा करून ज्येष्ठांसाठीच्या सर्व योजना या महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात याव्यात, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.**

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित ज्येष्ठ नागरिक धोरणाबाबत बैठकीच्या प्रसंगी ते बोलत होते. बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत, स्वच्छता – पाणी पुरवठा विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री( सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, युएनएफपीए संस्थेच्या अनुजा गुलाटी, अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष अमित टेकाळे यांच्यासह विविध विभागांचे सचिव आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की नुकत्याच झालेल्या निती आयोगाच्या बैठकीत विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. सन २०४७ पर्यंत भारतात ज्येष्ठांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी सोई–सुविधांची वाढणारी गरज लक्षात घेऊन आतापासून तयारी करणे आवश्यक आहे. सध्या शासनाने ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना सुरु केली या माध्यमातून थेट डीबीटीद्वारे लाभाचे वितरण करण्यात येत आहे. सोबतच एसटी प्रवास सवलत देण्यात आली आहे. येत्या काळात प्रत्येक महापालिका क्षेत्रात विरंगुळा केंद्राची निर्मिती करण्यात येईल.

या केंद्राद्वारे ज्येष्ठ नागरिकांसाठी डिमेंशिया, अल्जायमर या आजाराबाबत सहायता उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच ज्येष्ठांचे सेल्फ हेल्प ग्रुप तयार करुन ज्येष्ठांसाठी **(पान ४ वर)**

अर्थसंकल्पावरून राहुल गांधींचा मोदी सरकारवर चौफेर हल्लाबोल

# देश आता कमळाच्या आकाराच्या चक्रव्युहात

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी आज केंद्रीय अर्थसंकल्पावरून मोदी सरकारच्या कारभारावर चौफेर हल्ला चढवला. ते म्हणाले की आज संपूर्ण देशात भीतीचे वातावरण आहे. देश आता कमळाच्या आकाराच्या चक्रव्यूहात अडकला आहे. अभिमन्युला जसे चक्रव्युहात अडकवले गेले होते, तसेच आजही सहा जणांनी देशात हा चक्रव्युह तयार करून देशाला त्यात अडकवले आहे. हे सहा जण म्हणजे नरेंद्र मोदी, अमित शाह , मोहन भागवत, अजित डोवाल, अंबानी आणि अदानी,हे आहेत असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे देशातील शेतकरी, कामगार आणि तरुण घाबरलेल्या स्थितीत आहेत असेही ते म्हणाले.


### मोदींनी २१ व्या शतकात नवीन चक्रव्यूह तयार केला

*लोकसभेत अर्थसंकल्पावर बोलताना ते म्हणाले की, गेल्या भाषणात मी काही धार्मिक संकल्पनांबद्दल बोललो होतो. भगवान शंकराची संकल्पना आणि अहिंसेची संकल्पना अशी आहे की त्रिशूल पाठीमागे ठेवलं जातं आणि हातात धरलं जात नाही. मी शंकराच्या गळ्यातल्या सापाबद्दल बोललो होतो आणि हेही सांगितलं होतं की आपल्या देशातील धर्मांनी अहिंसेची कल्पना मांडली, ज्याला डरो मत या वाक्यात संकलित करता येईल. तथापी आज सरकारने पसरवलेली ही भीती इतकी खोलवर का पसरली आहे की भाजपमधील माझे मित्र घाबरले आहेत, मंत्री घाबरले आहेत, भारतातील शेतकरी घाबरले आहेत, आणि कार्यकर्ते आणि तरुण घाबरले आहेत. मोदींनी २१ व्या शतकात नवीन चक्रव्यूह तयार केला आहे.*

### ...पण आम्ही हे 'चक्रव्यूह' मोडून काढणार आहोत

हजारो वर्षांपूर्वी, कुरुक्षेत्रात, सहा जणांनी अभिमन्यूला 'चक्रव्यूह'मध्ये अडकवून त्याची हत्या केली. मी थोडे संशोधन केले आणि कळले की 'चक्रव्यूह' याला 'पद्मव्यूह' म्हणजे 'कमळाची निर्मिती' असेही म्हणतात. या चक्रव्युहात तरुण, शेतकरी, स्त्रिया, लहान आणि मध्यम उद्योग आजही सहा लोकांच्या 'चक्रव्यूह'च्या केंद्रात आहेत. नरेंद्र मोदी, अमित शा , मोहन भागवत, अजित डोवाल, अंबानी आणि अदानी,हे ते सहा लोक आहेत असे ते पुढे म्हणाले. यावेळी सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी राहुल गांधी म्हणाले की तुम्हाला जर आवडत नसेल तर मी सहा ऐवजी केवळ तीनच लोकांची नावे घेईन. जर तुम्हाला हवे असेल तर मी एनएसए, अंबानी आणि अदानी यांची नावे वगळून फक्त ३ नावे घेईन.

राहुल म्हणाले की, अर्थसंकल्पाने मध्यमवर्गाला धक्का दिला आहे, ज्या चक्रव्यूहाने भारत काबीज केला आहे, त्यामागे तीन शक्ती आहेत. प्रथम मक्तेदारी भांडवलाची कल्पना, म्हणजे संपूर्ण भारतीय संपत्ती दोन व्यक्तींना मिळावी यासाठी सुरू असलेला आटापीटा. म्हणून चक्रव्यूहचा एक घटक आर्थिक शक्तीच्या एकाग्रतेतून येत आहे. दुसरा घटक म्हणजे सीबीआय, ईडी आणि आयकर विभाग अशा केंद्रीय संस्था आणि तिसरा घटक राजकीय कार्यकारिणी हे चक्रव्यूहाचे केंद्रस्थान आहे आणि त्यांनी या देशाला उद्ध्वस्त केले आहे. केंद्र सरकारने तयार केलेले चक्रव्यूह करोडो लोकांचे नुकसान करत आहे असे ते म्हणाले. पण आम्ही हे 'चक्रव्यूह' मोडून काढणार आहोत. तुम्हाला घाबरवणारा हा सर्वात मोठा मार्ग म्हणजे जात जनगणना. मी म्हटल्याप्रमाणे इंडिया आघाडी हे काम करेल. या सभागृहात हमीभावाने कायदेशीर एमएसपीचा ठराव संमत करा तसेच जात जनगणना त्वरीत करा अशी मागणीही त्यांनी केली. अर्थसंकल्पातील इंटर्नशिप घोषणेवरूनही राहुल गांधींनी केंद्रावर टीका केली.



# तुम्हाला अपात्र का करु नये?

### अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाचा सवाल

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेस अपात्रता प्रकरणात सोमवारी झालेल्या सुनावणीत अजित पवार गटाला मोठा धक्का बसला. तुम्हाला अपात्र का करु नये? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे. तसेच या संदर्भात नोटीस जारी करत चार आठवड्यांत उत्तर मागविले आहे. याशिवाय शिवसेना आणि राष्ट्रवादी संदर्भात दाखल असलेल्या याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्यात येणार आहे.



### ३ सप्टेंबरला सुनावणी

*■ शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या आमदार अपात्रता प्रकरणांची सुनावणी एकापाठोपाठ घेतली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी ३ सप्टेंबरला होणार आहे. ■ त्यामुळे ३ सप्टेंबरलाच हे मॅटर ऐकले जाईल, अशी चिन्हे आहेत. ३ सप्टेंबरला जर सुनावणी झाली तर सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत या प्रकरणाचा निकाल येऊ शकतो.*

### नोटिशीला उत्तर देण्यासाठी चार आठवड्यांची मुदत

■ राष्ट्रवादीप्रमाणेच शिवसेनेच्या फुटीर आमदारांच्या प्रकरणातही न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावरील सुनावणीच्या दरम्यान न्यायालयाने ही नोटीस बजावली. शिवसेना आमदारांवरील सुनावणीबरोबरच राष्ट्रवादीचे प्रकरण सुनावणीसाठी येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

■ एकनाथ शिंदे यांच्या गटातील शिवसेना आमदारांना अपात्र करा, अशी मागणी करणारी याचिका उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणावर ३ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

■ त्याचदिवशी राष्ट्रवादीच्या आमदारांवरील प्रकरणाचीही सुनावणी होईल. या सुनावणीपूर्वी अजित पवार आणि त्यांच्या ४१ आमदारांना नोटीस बजावली आहे. या नोटिशीला उत्तर देण्यासाठी चार आठवड्यांची मुदत देण्यात आली आहे.

## महाराष्ट्राची लूट करणाऱ्यांना तुरुंगात टाकू : आदित्य ठाकरे

मुंबई–महाराष्ट्रातील आणि विशेषतः मुंबईत असे अनेक रस्ते आहेत, जिथे खड्ड्यात रस्ते की रस्त्यावर खड्डे असा प्रश्न पडतो. या रस्त्याच्या मुद्द्यावरून विरोधक कायमच सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत असतात. विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे हे कायमच या मुद्द्यावरून सरकारला खडेबोल सुनावत असतात. आता पुन्हा एकदा आदित्य ठाकरे यांनी या मुद्द्यावरून सरकारवर टीका केली असून महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर रस्ते कामात घोटाळा करणाऱ्यांना तुरुंगात टाकू, असा इशारा आदित्य ठाकरेंकडून देण्यात आला आहे.

रस्ते कामाबाबत बोलण्यासाठी ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद बोलावली होती. यावेळी ते म्हणाले की, या नोव्हेंबरमध्ये आमचे सरकार बसणार आहे. त्यानंतर रस्ते कामांबाबतचे पेमेंट थांबवून याबाबतची सखोल चौकशी करणार. यामध्ये मागील महापालिका आयुक्त असो किंवा आताचे असो, कोणतेही अधिकारी असो किंवा कोणताही शिंदे गटातील मंत्री असेल, त्यांना आम्ही तुरुंगात टाकल्याशिवाय थांबणार नाही. कारण ही मुंबईची लूट सुरू आहे. एका बाजूला मुंबईची लूट सुरू असताना दुसरीकडे रस्त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राची रस्त्यांच्या माध्यमातून अफाट लूट सुरू असल्याचा आरोपही आदित्य ठाकरेंकडून करण्यात आला आहे.












## ठाण्यात झाड व ट्रान्स्फार्मर केबिनची भिंत पडली-जमीन खचली

ठाणे - ठाण्यात ढगाळ वातावरण आणि रिमझिम संतत धार सुरूच होती. सोमवारी सकाळी १०-४५ वाजण्याच्या सुमारास ठाण्यात वाघबीळ रोडवर झाड पडण्याची घटना घडली. तर दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास चांदीवाला कॉम्प्लेक्स बाजूला असलेला महावितरणच्या ट्रान्सफॉर्मर केबिनची भिंत पडल्याची घटना घडली. या दोन्हीही घटनेत कुणीही जखमी झालेले नसळायची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. सोमवारी सकाळी १०-४५ वाजण्याच्या सुमारास शंभू टॉवर जवळ, कॉसमॉस पार्क, वाघबीळ रोड, वाघबीळ, ठाणे (प.) या ठिकाणी एक झाड रोड वरती पडले. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान ०१-रेस्क्यू वाहनासह उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही.घटनास्थळी रोडवरती पडलेले झाड अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने कापून बाजूला करण्यात आले. तर दुसरी घटना दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास चांदीवाला कॉम्प्लेक्स बाजूला असलेला महावितरणच्या ट्रान्सफॉर्मर केबिनची भिंत अचानक पडली. भिंत सुमारे ३० फूट लांब आणि १० फूट उंच भिंत पडल्याने उर्वरित भिंत धोकादायक झालेली आहे. तर भिंत पडल्याने जमीनही खचल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. घटनास्थळी सार्वजनिक बांधकाम विभाग, उथळसर प्रभाग समितीचे कनिष्ठ अभियंता, महावितरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, उथळसर प्रभाग समितीचे अतिक्रमण विभाग कर्मचारी यांनी मदतकार्य केले. तर घटनास्थळी सुरक्षेच्या कारणास्तव आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांचे मार्फत धोकापट्टी बांधण्यात आली.



ठाणे, मंगळवार दि. ३० जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : १२ पाने : ६, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®
दैनिक महाराष्ट्र सम्राट
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे



पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती प्रदर्शनास ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ...पान ५ वर

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचा ब्लॉकस्तरीय आढावा बैठकांचा धडाका सुरु ...पान ५ वर




# UPSC नंतर आता MPSC मधील दिव्यांग कोटा रडावर

**अकोला : यूपीएससीत निवड झालेल्या पूजा खेडकर यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रावरुन वादंग उठला आहे. त्यानंतर आता इकडे MPSC च्या पदभरतीतही असाच प्रकार झाल्याची शक्यता आहे. 'यूपीएससी' नंतर आता 'एमपीएससी'च्या पदांमधील दिव्यांग कोट्यात खोटी प्रमाणपत्रे सादर करण्यात आल्याची शंका आहे. त्यामुळे ९ जण जे असे प्रमाणपत्र दाखवून अधिकारी झाले आहेत, ते रडारवर आहेत. या नऊ जणांची आजपासून पुढचे दोन दिवस नव्याने शारीरिक चाचणी होण्याची शक्यता आहे.**

## १० पैकी नऊ उमेदवारांची प्रमाणपत्र संशयाच्या भोवऱ्यात

२०२२ मध्ये झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील दिव्यांग कोट्यातून निवड झालेल्या १० पैकी नऊ उमेदवारांची प्रमाणपत्र संशयाच्या भोवऱ्यात आहे. या सर्व उमेदवारांची शारीरिक तपासणी करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने एमपीएससीला दिले आहेत. या सर्व उमेदवारांच्या आजपासून पुढचे दोन दिवस नव्याने शारीरिक चाचण्या होण्याची शक्यता आहे. एकूण ६२३ पदांसाठी परीक्षा झाली होती. यातील १० जागा दिव्यांगांसाठी राखीव होत्या.




## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तक्रार दखल

१ दिव्यांग कोट्यातून उपजिल्हाधिकारी पदावर निवड झालेल्या बुलढाणा येथील एका उमेदवाराचं दिव्यांग प्रमाणपत्र संशयाच्या भोवऱ्यात आहे. दिव्यांग कोट्यातून निवड झालेल्या या उमेदवाराने याआधी खेळाडू, अंध आणि इतर कोट्यांचा फायदा घेतला होता. त्यांच्या निवडीवर आक्षेप घेत, त्यांची तक्रार 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगा'चे अध्यक्ष रजनीश शेठ यांच्याकडे करण्यात आली आहे.

२ यासंदर्भात तक्रार करणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांच्या कानावरही हा प्रकार घातला आहे. आमदार मिटकरींनी यासंदर्भात सरकार आणि प्रशासकीय पातळीवर यासंदर्भात चर्चा करीत कारवाईची मागणी केलीये.

# मोबाईल मेडिकल युनिटसाठी ३८ कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश

ठाणे – आरोग्य विभाग अंतर्गत आरोग्य आणि पोषण सारख्या मुलभुत सुविधा देण्याबाबत लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यात अदिवासी व अतिदुर्गम भागात १० मोबाईल मेडिकल युनिटसाठी ३८ कर्मचारी यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व जिल्हा अरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या हस्ते आज नियुक्ती आदेश देण्यात आले.

१ मोबाईल मेडिकल युनिट मुरबाड व शहापूर तालुक्यात सुरू असून, ०९ मोबाईल मेडिकल युनिट १ ऑगस्टपासून जिल्ह्यात सुरू करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी काम करण्यासाठी ही उत्तम संधी आहे. आरोग्य सेवा देण्यासाठी प्रयत्नशील व प्रामाणिकपणे कामकाज करावे असे मार्गदर्शन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. मोबाईल मेडिकल युनिट उपक्रमातंर्गत ठाणे जिल्ह्यात ८१ दुर्गम अणि अतिदुर्गम भागामध्ये आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १० मोबाईल मेडिकल युनिट ग्रामीण भागात तयार करण्यात आले आहेत. यासाठी वैद्यकीय अधिकारी




१०, जीएनएम ८, लॅब टेक्नीशियन १० व फोर्मासिस्ट १० असे एकूण ३८ कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश आज देण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोबाईल मेडिकल युनिट प्रकल्पाअंतर्गत मुरबाड तालुक्यात ३, शहापुर तालुक्यात ३, भिवंडी तालुक्यात २, अंबरनाथ तालुक्यात १ व कल्याण तालुक्यात १ असे एकूण १० मोबाईल मेडिकल युनिट सुरू करण्यात येणार आहे. प्रत्येक मोबाईल मेडिकल युनिटसाठी वैद्यकीय अधिकारी, जीएनएम, लॅब टेक्नीशियन व फोर्मासिस्ट असे एकूण ४ अधिकारी व कर्मचारी कार्यरत असणार आहेत.

## १३ ऑगस्ट रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

नवी मुंबई दि.२९ :- कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

सदर पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे महेंद्र बेलदार,तहसिलदार,(सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# रामलीलेप्रमाणे गणेशोत्सव मंडळांनाही मंडपाच्या भाड्यात सवलत हवी

मुंबई – गणेशोत्सवाला आता एका महिन्यावर येऊ घातला असता. मंडप उभारणीसाठी गणेशोत्सव मंडळांची धावपळ सुरू झाली आहे. मुंबईमध्ये मोकळ्या जागांच्या कमतरतेमुळे काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पालिकेच्या मैदानात मंडप उभारतात. मंडप उभारणीसाठी पालिकेकडून भाडे आकारले जाते. रामलीलासाठी पालिका प्रशासन मंडळांना ५० टक्के सवलत देते. त्याप्रमाणे पालिकेच्या मैदानात गणेशोत्सवासाठी मंडप उभारताना आकारण्यात येणाऱ्या शुल्कात ५० टक्के सवलत द्यावी. तसेच मंडळाच्या सुरक्षेच्या दृष्टीने मंडप परिसरात नि:शुल्क अग्निशमन दलाची सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी बृहन्मुंबई गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे.

गणेश मंडळे ३० दिवस सजावट करण्यासाठी व ३ दिवस सजावट काढण्यासाठी अशा २ वेगवेगळ्या परवानगी कित्येक वर्ष काढत असतात. परंतु यासाठी पालिकेकडून आकरण्यात येणारी अनामत रक्कम व भाडे मंडळाकडे जमा होणाऱ्या तुटपुंज्या वर्गणी, देणगीचा विचार करता अवाजवी आहे. मुंबईत साजरा होणाऱ्या रामलीला कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या पालिकेच्या मैदानाच्या भाड्यात महाराष्ट्र शासनाच्या मुंबई उपनगर पालकमंत्री यांच्या आदेशान्वये पालिकेच्या मैदानाचा रामलीला मैदानासाठी वापर करण्यासाठी भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात आली. यासाठी पालिकेने ६ ऑक्टोबर २०२३ रोजी पत्र निर्गमित केले होते, इतकेच नव्हे तर अग्निशमन सेवा निशुल्क वापरण्याची आदेशही देण्यात आले आहे.

गणेशोत्सव हा मुंबईत साजरा होणारा जगप्रसिद्ध उत्सव आहे. त्यामुळे रामलीला कार्यक्रमासाठी देण्यात येणाऱ्या सवलती प्रमाणेत गणेश मंडळाकडून वापरण्यात येणाऱ्या महापालिकेच्या मैदानाच्या भाड्यात ५० टक्के सवलत मंडळांना देण्यात यावी तसेच ५०० हून अधिक भाविक जमा होणाऱ्या मंडळाच्या मंडपाशेजारी निशुल्क अग्निशामक सेवा पुरविण्यात यावी अशी मागणी मुंबई गणेशोत्सव समन्वय समितीने पालिका प्रशासनाकडे केली आहे.

# सिडको महागृहनिर्माणातील लाभार्थ्यांना हजारो रुपयाचा मालमत्ता कराचा भुर्दंड

पनवेल : सिडको महामंडळ आणि पनवेल महापालिका यांच्यातील असमन्वयाचा फटका सिडकोने बांधलेल्या महागृहनिर्माण योजनेतील सामान्य लाभार्थ्यांना सहन करावा लागत आहे. या लाभार्थ्यांना इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून मालमत्ता कर आकारणी पालिकेने केली आहे. मात्र शेकडो लाभार्थ्यांनी सहा महिने व एक वर्षानंतर ताबा मिळाल्याने लाभार्थ्यांच्या खिशावर हजारो रुपयांचा भुर्दंड पडला आहे. सिडको मंडळाने महागृहनिर्माण योजनेतील सदनिकांची सोडती काढून त्यानुसार लाभार्थ्यांची निवड केली. तसेच ज्या लाभार्थ्यांनी लवकर सदनिकेची रक्कम भरली त्यांना लवकर सदनिकेचा ताबा तर काहींना उशिराने सदनिकेचा ताबा दिला

> विकासक या नात्याने ही घरे ताबा देण्यापूर्वी सिडकोकडे होती. त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून ते ताबा देण्याच्या कालावधीतील मालमत्ता कर सिडकोने भरला पाहिजे. तसेच आम्हाला मालमत्ता कराची बिले ह्या वर्षी पहिल्यांदा देण्यात आलेली असल्याने शास्तीची रक्कम रद्द केली पाहिजे. आणि घसाराबाबत नियम लावून त्याचा लाभ आम्हाला महापालिकेने दिला पाहिजे.
> –संजय भोगले, लाभार्थी, बागेश्री गृहसंकुल, खारघर

> याबाबत पनवेल महापालिकेकडे काही निवेदने प्राप्त झालेली आहेत. सिडको मंडळाकडे आम्ही पत्रव्यवहार करून तो विषय मार्गी लावण्याबाबत सातत्याने प्रयत्नशील आहोत. शास्ती रद्द करणे तसेच घसारा लावून सूट देण्याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.
> –बाबासाहेब राजळे, उपायुक्त (कर), पनवेल महानगरपालिका

काम हाती घेतले. यापैकी हजारो सदनिकांचे बांधकाम सिडकोने पूर्ण केले. परंतू सदनिकेचा घराचा ताबा सहा महिने तर काहींना वर्षभरानंतर मिळाला. त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्रा नंतरचा आणि ताबा प्राप्त होण्याअगोदरच्या महिन्यांचा आणि वर्षांचा हजारो रुपयांचा मालमत्ता कर पनवेल महापालिकेने सदनिकाधारकांकडून वसूल करण्यासाठी त्यांच्या करदेयकात लावला आहे. तसेच संबंधित मालमत्ता कर न भरल्यास त्यावर दंड लावला जाणार आहे. त्यामुळे सिडकोच्या लाभार्थ्यांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार बसत असल्याची भावना सदनिकाधारकांची बनली आहे. महानगरपालिकेने करदेयकात ताबा मिळालेल्या तारखेनंतरचा कर आकारावा, करावर लावलेली शास्ती रद्द करावी आणि इमारत घसाराबाबतचा नियम लावून मालमत्ता कर आकारणी कमी करावी अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.

(छाया : मनोज सिंह)



ठाण्यातील वागळे इस्टेट रास्ता क्रं १६ रस्ता येथील सीपी तलाव डम्पिंग ग्राउंडमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिक त्रस्त झाले असून सोमवारपर्यंत ढिगारा हटवा अन्यथा कचऱ्याच्या गाड्या अडवून कचरा कोंडी करू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर बचाटे यांच्यासह नागरिकांनी दिला आहे.



## माजी नगरसेवक बळीराम नई बागकर याचे दुःखद निधन

श्री साईनाथ सेवा समितीचे संस्थापक, अध्यक्ष व माजी नगरसेवक श्री बळीराम नई बागकर यांचे आज सांयकाळी अल्पशा आजाराने निधन झाले . ईश्वर त्यांचा आत्म्यास शांति देवो हि ईश्वर चरणी प्रार्थना.

## आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

पनवेल : आ.प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सिंधुदूर्ग जिल्हा रहिवासी संघातर्फे वृक्षारोपण करण्यात येणार आहे.




महिलांवर होणाऱ्या अत्याचारच्या विरोधात राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आक्रोश आंदोलन करून निदर्शने केली. (छाया : मनोज सिंह)

# तिहेरी हत्याकांडाच्या चौकशीअंती डॉ. पोळ यांना अटक

पनवेल : मावळ येथील तिहेरी हत्याकांड प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी कळंबोली येथील अमर रुग्णालयाचे मालक आणि पीडितेवर उपचार करणारे डॉ. अर्जुन पोळ यांना अटक केली आहे. डॉ. पोळ यांना ३० जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे.

६ ते ९ जुलै या दरम्यान मावळ मध्ये राहणार्या पीडितेला गर्भपातासाठी कळंबोली येथील अमर रुग्णालयात आणले होते. पीडितेसोबत तिचे दोन व पाच वर्षांची बालकं होती. पीडितेचा मृत्यू अमर रुग्णलयात झाल्यावर तिच्या प्रियकर आणि त्याच्या साथीदाराने तीचा मृतदेह इंद्रायणी नदीत फेकून दिला होता. बालकांनी त्यांच्या आईला इंद्रायणीत फेकल्याचे पाहून हंबरडा फोडल्याने प्रियकर व त्याच्या साथीदाराने जिवंत बालकांना इंद्रायणीत फेकून दिले होते. या घटनेनंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केल्यानंतर एकापाठोपाठ एक आरोपींना अटक केली. अमर रुग्णालयातील डॉ. पोळ यांची मागील तीन दिवसांपासून चौकशी सुरु होती. अखेर तळेगाव एमआयडीसी पोलिसांना चौकशीअंती डॉ. पोळ यांना अटक केल्याची माहिती या प्रकरणाचा तपास करणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक शाम म्हस्के यांनी दिली.

डॉ. पोळ यांनी पीडितेचा उपचारानंतर मृत्यू झाल्याची बाब स्थानिक पोलिसांपासून लपवून ठेवली. पीडितेच्या मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यास अनेक बाबी स्पष्ट होऊ नये म्हणून बनाव करण्यात आल्याचा आरोप डॉ. पोळ यांच्यावर करण्यात आला होता. डॉ. पोळ यांना सरकारी वैद्यकीय अधिकारी ते वैद्यकीय अधीक्षक पदापर्यंत सेवेचा अनुभव होता. पनवेल महापालिकेने डॉ. पोळ यांच्या अमर रुग्णालयाची नोंदणी रद्द केली आहे. पनवेल पालिकेच्या आरोग्य विभागाने चार महिन्यांपूर्वी एका प्रसुतीदरम्यान मातेचा मृत्यू झाल्याने डॉ. पोळ यांना अमर रुग्णालयत एकही नवीन रुग्ण दाखल (ॲडमीट) करु नये याबाबत नोटीस दिली होती. तरीही डॉ. पोळ यांनी मावळच्या पीडितेवर दाखल करुन दिवसभर उपचार केले. या घटनेनंतरही नवी मुंबई पालिकेच्या आरोग्य विभागाने कोपरखैरणे येथील सेक्टर ६ मधील रोहाऊस क्रमांक ७६ मध्ये दवाखान्याची नोंदणी कायम ठेवली आहे.

**महिलांवरील वाढत्या अत्याचारविरोधात राष्ट्रवादी महिला काँग्रेस– शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक**

# तपासाकडे पाहता पोलिसांची किव येतेय : ऋता आव्हाड

ठाणे : गेल्या काही दिवसांपासून राज्यात महिलांवरील अत्याचारात प्रचंड वाढ होऊ लागली आहे. त्याविरोधात राष्ट्रवादी महिला काँग्रेस– शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक झाला असून ठाण्यात जोरदार निदर्शने करून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी केली.

डायघर येथे एका मंदिरामध्ये अक्षता म्हात्रे या महिलेवर तीन पुजार्यांनी बलात्कार करून नंतर तिची हत्या केली. तर उरण येथे एका यशश्री शिंदे या तरूणीची अत्यंत निर्घृण हत्या करण्यात आली. गुन्हेगारांना पोलिसांची भीतीच राहिली नसल्याने असे प्रकार घडत असल्याचा आरोप करीत डॉ.जितेंद्र आव्हाड तथा प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्या मार्गदर्शनानुसार ठाणे – पालघर विभागिय महिलाध्यक्षा ऋता आव्हाड, ठाणे शहराध्यक्षा सुजाताताई घाग, कार्याध्यक्षा सुरेखाताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

यावेळी महिलांनी राज्य सरकारच्या निषेधार्थ घोषणा देऊन खटला फास्ट ट्रॅकवर चालवून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, महिला संरक्षणाचे धोरण राबविता येत नसल्याने मुख्यमंत्री, गृहमंत्री यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

या प्रसंगी ऋता आव्हाड म्हणाल्या की, अक्षता म्हात्रेच्या कुटुंबातील सदस्यांची भेट घेतल्यानंतर असे जाणवले की पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. त्यांच्या तपासाकडे पाहता त्यांची किव येते. निवडणुका आल्याने लाडकी बहीण योजना आणली असेल तर निवडणुकांकडे पाहून बहिणींना सुरक्षा द्यावी. अक्षताचे मारेकरी सापडले असले तरी यशश्रीचा मारेकरी मोकळा आहे. त्यालाही जेरबंद करावे आणि लवकरात लवकर शिक्षा द्यावी, अशी मागणी केली. तर सुजाता घाग यांनी या नराधमांना लवकरात लवकर शिक्षा द्यावी. जेणेकरून दुसर्या कुणाची असे गुन्हे करण्याची हिंमत होणार नाही असे सांगितले.

या आंदोलनात मा. नगरसेविका अपर्णा साळवी, आरती गायकवाड, प्रदेश प्रवक्त्या रचना वैद्य, प्रदेश प्रतिनिधी शशी पुजारी, मनिषा करलाद, माधुरी सोनार, प्रियांका सोनार, विधानसभाध्यक्षा साबिया मेनन यांच्यासह महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, युवक अध्यक्ष विक्रम खामकर, विद्यार्थी अध्यक्ष प्रफुल कांबळे, गजानन चौधरी, सचिन पंधेरे, हिरा पाटील आदी उपस्थित होत्या.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## जगमोहन यांची राजकीय भूमिका

केंद्र आणि राज्यातील राजकीय समीकरणे पाहता भाजप चंद्राबाबूंना साथ देत आहेत असेच दिसते. स्वतःचे अस्तित्व राखण्यासाठी आंध्र प्रदेशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या वाय.एस.आर. काँग्रेसचे नेते जगनमोहन हे नवीन पर्याय शोधत असल्याचे दिसत आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात बिहार आणि आंध्र प्रदेश या राज्यांना झुकते माप दिल्याचा विरोधकांकडून आरोप सुरू आहे. भाजपने मात्र या आरोपाचे खंडन केले आहे. आता राष्ट्रीय पातळीवर नव्या राजकीय समीकरणांची चर्चा सुरू झाली. आंध्र प्रदेशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेला वाय. एस.आर. काँग्रेस विरोधकांच्या इंडिया आघाडीत जाणार काय, हा मुद्दा समोर येत आहे. त्याला अनेक कारणेही आहेत. वायएसआर काँग्रेसचे सर्वेसर्वा व आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी नुकतेच दिल्लीत एका प्रदर्शनाचे आयोजन केले होते. जूनमध्ये राज्यात सत्तांतर होऊन तेलुगू देसम–जनसेना आणि भाजप यांना संधी मिळाली. मात्र या सव्वा ते दीड महिन्याच्या काळात सत्तारूढ पक्षांनी विशेषत: तेलुगू देसमने वायएसआर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना लक्ष्य केल्याचा आरोप जगनमोहन यांचा आहे. याबाबत मारहाणीच्या छायाचित्रांचे प्रदर्शन त्यांनी थेट दिल्लीत आयोजित केले होते. आपल्या ३१ कार्यकर्त्यांची हत्या केल्याचा, तर छळवणुकीने ३५ जणांनी आत्महत्या केल्याचा दावा वायएसआर काँग्रेसने केला आहे. रक्त चरित्र नावाची पुस्तिकाच या प्रदर्शनावेळी प्रकाशित करण्यात आली. या प्रदर्शनाला समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा अखिलेश यादव, ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी हजेरी लावली होती. यासोबत तृणमूल काँग्रेस तसेच द्रमुकचे नेतेही उपस्थित होते. तसेच अण्णा द्रमुक, आपच्या नेत्यांनी हजेरी लावत पाठिंबा व्यक्त केला. यामुळे जगनमोहन हे भाजपविरोधी गोटात जाण्याची चर्चा सुरू झाली आहे. ते इंडिया आघाडीत सामील होतील याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जगनमोहन यांनी काँग्रेसमधून बाहेर पडत २०११ मध्ये वायएसआर काँग्रेसची स्थापना केली होती. जगनमोहन यांचे वडील व तत्कालीन मुख्यमंत्री वाय. एस.राजशेखर रेड्डी यांचे २००९ मध्ये हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. त्या वेळच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने आंध्रचे विभाजन केले. यानंतर काँग्रेसला राज्यात उतरती कळा लागली. जगनमोहन यांनी पक्ष स्थापनेपासून १३ वर्षांत भाजप किंवा काँग्रेस या दोन्ही प्रमुख राष्ट्रीय पक्षांशी आघाडी केलेली नाही, हे विशेष होय. उलट राज्यसभेत वेळोवेळी भाजपच्या मदतीला ते धावून आले होते. त्यामुळे या पक्षाचे ते सहानुभूतीदार अशीच त्यांची ओळख आहे. मात्र आता आंध्रमध्ये भाजपचा नवा मित्रपक्ष तेलुगू देसम पकड निर्माण करू पाहात आहे. या पक्षाचे सर्वेसर्वा व राज्याचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या पक्षाची मदत भाजपला केंद्रातील स्थैर्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत असताना दिसत आहे. जगन यांना असे वाटते की, आपला पक्ष संपवण्याच्या दृष्टीने भाजप तेलगू देसमला मदत करत आहे काय ? या शंकेने ते त्रस्त झाले असून राजकीय वाटचाल बदलण्याच्या त्यांनी हालचाली सुरू केल्याचे दिसते. जगन यांचे लोकसभेत चार, तर आंध्र विधानसभेत केवळ ११ सदस्य आहेत. आता जगनमोहन भाजपला आव्हान देणार काय, असा प्रश्न आहे. मात्र इंडिया आघाडीचा प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसची अडचण आहे. राज्यात जगनमोहन यांच्या भगिनी शर्मिला या प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यामुळे जगनमोहन यांना आघाडीत घेतल्यास त्यांची कोंडी होणार असल्याचे दिसते. यामुळे जगनमोहन यांनी निमंत्रण देऊनही काँग्रेसच्या नेत्यांनी दिल्ली येथील प्रदर्शनाकडे पाठ फिरवल्याचे म्हटले जात आहे. विरोधात असल्याने कोंडीत सापडलेले जगनमोहन थेट इंडिया आघाडीत जातात काय, हा मुद्दा आहे. काही दिवसांत हे स्पष्ट होऊ शकते.आंध्र प्रदेशचे राजकारण मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि जगनमोहन रेड्डी या दोन नेत्यांभोवती फिरत आहे. अन्य पक्षांना येथे जनाधार नसल्याचे दिसते. भाजप जरी राज्यातील सत्तेत असला तरी तेलुगू देसमच्या मदतीनेच त्यांना काही जागा जिंकता आल्या. यामुळे केंद्र आणि राज्यातील राजकीय समीकरणे पाहता भाजप चंद्राबाबूंना साथ देणार हे उघड आहे. अशा वेळी अस्तित्व राखण्यासाठी जगनमोहन यांना नवे पर्याय पडताळून पहावे लागणार आहेत. आजही राज्यसभेत त्यांचे ११ सदस्य आहेत. लोकसभा निकालानंतर भाजपचे राज्यसभेतील संख्याबळ ८४ च्या आसपास आहे. यामुळे विधेयके संमत होण्यासाठी जगनमोहन यांच्या पक्षाची महत्त्वाची भूमिका ठरेल. जगनमोहन मुरब्बी राजकारणी आहेत. यापूर्वीही प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी राज्यभर यात्रा काढत पक्षाला यश मिळवून दिले होते. ७४ वर्षीय चंद्राबाबूंचे पुत्र नारा लोकेश यांच्याकडे आंध्र सरकारमध्ये माहिती तंत्रज्ञान खात्याची जबाबदारी आहे. आगामी काळात ते अधिक सक्रिय होतील अशी चिन्हे आहेत. विरोधी कार्यकर्त्यांवर राज्यात हल्ले होत आहेत असा संदेश गेला तर जगनमोहन यांना देशभरातील राजकीय पक्षांची सहानुभूती मिळण्याची शक्यता अधिक आहे. मग भाजपची कोंडी होईल. कारण जगनमोहन यांचा पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीत येणार अशी चर्चा पूर्वी होती. मात्र जगनमोहन यांनी कटाक्षाने भाजपशी थेट युती टाळली. जनसेना पक्षाचे प्रमुख असलेले अभिनेते पवन कल्याण यांच्या पुढाकाराने भाजपची तेलुगू देसमशी आघाडी झाली. केंद्रीय अर्थसंकल्पात आंध्रचा वारंवार झालेला उल्लेख पाहता भाजपने चंद्राबाबू यांच्या मागण्यांना प्रतिसाद दिला. यामुळे जगनमोहन व भाजप यांच्यातील सौहार्द कमी होईल. अशा वेळी ते विरोधकांच्या जवळ जाऊ शकतात. त्यातून राष्ट्रीय राजकारणात फेरबदल होऊन १५ खासदार (राज्यसभा व लोकसभा) असलेले जगनमोहन सत्ताधाऱ्यांपुढे नवीन आव्हान उभे करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच जगमोहन यांची देशभर चर्चा सुरू झाली आहे.


### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका हद्दीतील लोकमान्य- सावरकरनगर प्रभाग समिती क्षेत्रातील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास" या लेखाशिर्षका अंतर्गत प्र.क्र. १३ मध्ये विविध ठिकाणी गटार व पायवाटा करणे, अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करणे, अभ्यासिका इमारतीची दुरुस्ती करणे व रंगरंगोटी करणे, व्यायामशाळेची दुरुस्ती करणे, उद्यानाला संरक्षक भिंत बांधणे, समाजहॉल बांधणे, साईड शोल्डरचे काँक्रिटीकरण करणे अशा एकूण चोवीस कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. ३१.०७.२०२४ ते दि. ०७.०८.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि.०७.०८.२०२४ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यांत येतील. सदर निविदा दि. ०८.०८.२०२४ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघड्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-लो.सा प्र.स/२१३/२०२४-२५ सही/-
दि:२९.०७.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**



**FORM N.D.**
**(See rule 92(3))**

It is hereby informed for the knowledge of public that Shri. Dinkar Mahadev Gavali owner of the Motor Vehicle No. MH-04 KG 9023 Covered by Chasis No. 0014695, Engine No. 0505497 has expired on 29.09.2021.

I Shri. Mahadev Lakhu Gavali Address Room no.1, Royal Colony, Raja Shivaji Vidyalaya Road, Lokmanya Nagar, Pada No.4, Thane West - 400606 being the successor to the above mentioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority / Regional Transport Office / Regional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this notice, being such fact to the notice of Regional Transport Office / Regional Transport Authority Thane.

Name of Successor **Shri. Mahadev Lakhu Gavali**
Address: **Room no.1, Royal Colony, Raja Shivaji Vidyalaya Road, Lokmanya Nagar, Pada No.4, Thane West - 400606**


## आता ज्येष्ठ नागरिकांसाठी ही कल्याणकारी महामंडळ

(पान १ वरून)

ज्येष्ठ अशा संकल्पनेतून मदत द्यावी, यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. पुढे मुख्यमंत्री यांनी सांगितले, ज्येष्ठांसाठी आवश्यक असणारे इन्फ्लुएन्जा, न्युमोनिया या लसींच्या लसीकरणासाठी सुरुवातीला मुंबई महापालिकेच्या माध्यमातून पायलट प्रोजेक्ट राबवावा. त्यानंतर राज्यभरात बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याच्या माध्यमातून या लसी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ज्येष्ठांच्या दारापर्यंत आरोग्य सुविधा नेण्यासाठी लवकरच हॉस्पिटल ऑन व्हील्स संकल्पना राबविण्याचा मनोदय मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. रेल्वे प्रवासात ज्येष्ठांना देण्यात येणारी सवलत पुन्हा सुरु करण्यासाठी आणि व्हीलचेअरसह इतर आवश्यक साहित्यांवरील आणि उपचारांच्या बिलावरील जीएसटी कमी करण्यासाठी केंद्र शासनाला पत्राद्वारे विनंती करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.


### मिरा भाईंदर महानगरपालिका

परिवहन विभाग

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे. ४०११०१.

**// जाहिर फेरनिविदा सुचना //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधण्यात आलेल्या उर्वरीत ५७ बस थांब्यावर ''जसे आहे तसे'' तत्वावर देवून देखभाल – दुरुस्तीसह जाहिरातीचे हक्क प्रदान करणेकामी Online ई–टॅरींग पध्दतीने जाहिर निविदा मागवित आहे. सदर कामाचे कोरे निविदा फार्म दि. ३१/०७/२०२४ ते दि. ०८/०८/२०२४ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या e-Tendering संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथे उपलब्ध होतील.

सदरकामी मागविलेल्या मोहरबंद निविदा दि. ०८/०८/२०२४ सायं. ५.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थाळावर स्विकारण्यात येतील व दि. ०९ /०८ /२०२४ रोजी सांय. ४:०० वाजता निविदाधारकांच्या उपस्थितीत अथवा अनुपस्थितीत ऑनलाईन उघडण्यात येतील.

जए. क्र. मनपा /मावज / E–२४४९१९९/२०२४–२५
दि. २९/०७/२०२४

सही/–
(अनिकेत मानोरकर)
अति. आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका



### ठाणे महानगरपालिका, ठाणे

संचालित

चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्मधिकारी ग्रंथालय इमारत, तळ मजला, वेदांत शॉपींग कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) ४०० ६०६. दुरध्वनी ०२२-२५८८१४२१,

"स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्ग (Foundation Batch) २०२४-२५"

प्रवेश परीक्षा - २०२४

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. तसेच, अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे. स्पर्धा परीक्षेत बसू इच्छिणाऱ्या आणि उच्च माध्यमिक परीक्षा व पदविका परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी अभ्यास क्रमाच्या पहिल्या (F.Y. Sci / F.Y.B.com / F.Y.BA / F.Y. Eng. Degree) अथवा दुसऱ्या (S.Y. Sci / S.Y.B.com / S.Y.BA / S.Y. Eng. Degree) या शैक्षणिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता सालाबादप्रमाणे या वर्षी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षेसाठी "स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्ग २०२४-२५ (Foundation Course)" सुरु करण्यात येणार आहे. या मार्गदर्शन वर्गात प्रवेश घेणेकरिता उच्च माध्यमिक परीक्षेत विज्ञान, वाणिज्य, कला शाखेत व पदविका परीक्षेत (Diploma Course) ६० % व ६० % पेक्षा अधिक टक्के गुण मिळालेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. सदर प्रवेश परीक्षेस इच्छुक विद्यार्थ्यांनी दि.०१/०८/२०२४ ते ३०/०८/२०२४ या कालावधीत संस्थेच्या अधिकृत www.cdinstitute.net या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या https://forms.epravesh.com/ CDInstitute/ या लिंक मधील विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. टपालद्वारे, कुरिअरद्वारे, तसेच ई-मेल द्वारे प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी. सदर प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती व सूचना संस्थेच्या नोटीस बोर्डावर तसेच ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in व संस्थेच्या www.cdinstitute.net या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

ठामपा/पिआरओ/चिंदेप्रस/ २१०/२०२४-२५ **सही/-**
दि:२९.०७.२०२४ संचालक
**pls visit our oficial web-site** चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था
**www.thanecity.gov.in** ठाणे महानगरपालिका,ठाणे



महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
एकात्मिक बाल विकास सेवा योजना

### बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) ठाणे शहर पुर्व
### अंगणवाडी मदतनीस मानधनी पदासाठी जाहिरात

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) ठाणे शहर– पूर्व या प्रकल्पातील ०१ रिक्त अंगणवाडी मदतनीस पदांची मानधनी तत्वावर भरती करावयाची आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे शहर– पुर्व या प्रकल्पाच्या नागरी क्षेत्रातील स्थानिक रहिवासी असलेल्या शैक्षणिक अर्हता व इतर अटींची पूर्तता करणा–या पात्र महिला उमेदवारांकडून विहीत नमुन्यांत अर्ज मागविण्यात येत आहे. प्रकल्पाच्या नागरी क्षेत्रा बाहेरील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच अपात्र उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील व त्या बाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे लेखी कळविण्यात येणार नाही. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दहा कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत अर्ज प्रत्यक्ष कार्यालयात शासकिय सुटटीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

पात्रता – १२ वी उत्तीर्ण, वय १८ ते ३५ वर्षे, विधवा उमेदवार वयोमर्यादा १८ ते ४० वर्षे, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र, बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) ठाणे शहर पुर्व यांच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक रहिवासी असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे रहिवासी प्रमाणपत्र तसेच इतर पुरावा उदा. मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, विद्युत बील / कर पावती यांची सत्यप्रत जोडावी. (प्रकल्प कार्यक्षेत्राची यादी कार्यालयाच्या नोटीसबोर्डावर लावण्यात आलेली आहे.)

| अ.क्र. | अंगणवाडी क्रमांक | अंगणवाडी केंद्राचे नाव | भरावयाचे मदतनीस पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | ५३ | न्यु शिवाजी नगर, कळवा | १ |

**अर्ज मिळण्याचे व जमा करण्याचे ठिकाण**
**बाल विकास प्रकल्प कार्यालय (ना) ठाणे शहर पुर्व, यांचे कार्यालय**
पत्ता– चित्ततोष बिल्डींग, २ रा मजला, मालती हॉस्पीटल समोर, चिंतामणी ज्वेलर्स जवळ, ठाणे (पश्चिम) –४००६०१

**सही/–**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**(ना), ठाणे शहर–पूर्व**

#### अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज

उमेदवाराचा अलिकडील काळातील काढलेला रंगीत फोटो

सूचना:– १. अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात लिहावा व अर्जात लिहितांना खाडाखोड करु नये..
२. दिलेल्या अटी व सूचनांचे अवलोकन करावे.
३. अपूर्ण भरलेले अर्ज अपात्र केले जातील

प्रति,
**मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी ठाणे शहर – पूर्व**

फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता

पदाचे नांव :...................... महानगरपालिका क्षेत्र – ............................
++.
१. उमेदवाराचे नाव कुमारी / श्रीमती /सौ. ..........................................................................
अर्जदाराचे लग्नानंतरचे नांव श्रीमती सौ. ..........................................................................
अर्जदाराचे लग्नापूर्वीचे नांव कुमारी. ..........................................................................

२. जन्म तारीख ........ / ........ / ........ (वयोमर्यादा १८ ते ३५ वर्ष)
जाहिरातीचे दिनांकास वय वर्ष ........ महिने ........ दिवस

३. निवासी पत्ता. ..........................................................................
..........................................................................
प्रभाग क्र. .............. वॉर्ड क्रमांक .............. ता. .............. जवळची
खुण ........................... रेशन कार्ड क्रमांक ..........................................

४. मागासवर्गिय आहात काय होय / नाही (होय असल्यास प्रमाणपत्र जोडावे)
असल्यास जात ........................... प्रवर्ग ..............................................

५. विधवा/अनाथ आहात काय? **होय / नाही.**
असल्यास – (१. विवाहाचा दाखला २. पतीचे मृत्यु प्रमाणपत्र व रेशन कार्ड ३. प्रतिज्ञापत्र विधवा असून पुनर्विवाह केलेला नाही.)

६. भाषेचे ज्ञान :–
मराठी भाषेचे ज्ञान आहे काय? होय नाही
मराठी भाषा लिहिता येते काय? होय नाही
मराठी भाषा वाचता येते काय? होय / नाही
स्थानिक भाषेचे ज्ञान आहे काय होय / नाही असल्यास कोणती? ............................

**७. शैक्षणिक पात्रता**–सोबत कागदपत्रे जोडावीत.

| इयत्ता | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी अपूर्णांकात | वर्ष | विषय आणि तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १२ वी. | | | | | |
| पदवीधर | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | |
| डी.एड. | | | | | |
| बी.एड. | | | | | |
| शासकीय मान्यता प्राप्त संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) | | | | | |

८. अनुभव अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षांचा अनुभव आहे काय ? होय । नाही.
९. असल्यास तपशिल ..........................................................................
( असल्यास प्रमाणपत्र जोडावे.)

१०. **लहान कुटूंब** (लहान कुटूंब व दोन मुले व पती पत्नी असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडावे.

| अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :– | होय | नाही |
|---|---|---|
| १) विहीत नमुन्यातील व स्वहस्ताक्षरातील फोटो लावलेला अर्ज | | |
| २) आधारकार्डाची प्रत | | |
| ३) शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्रे | | |
| इयत्ता १२ वीचे कागदपत्र | | |
| इतर शैक्षणिक पात्रता कागदपत्र व प्रमाणपत्र | | |
| ४) वयाचा पुरावा– | | |
| i. १० चे बोर्ड सर्टिफिकेट | | |
| ii. जन्म दिनांक नमूद असलेला शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला | | |
| iii. नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायतीचा जन्म दाखला, | | |
| ५) विधवा व अनाथ मुलींचे प्रमाणपत्र (असल्यास):– | | |
| ६) विवाह दाखला | | |
| पतीचा मृत्यु प्रमाणपत्र | | |
| पुर्नविवाह न केल्याचे प्रतिज्ञापत्र | | |
| ७) जात प्रमाणपत्र /जातीचा दाखला (लागू असल्यास) | | |
| ८) अंगणवाडी सेविका अंगणवाडी मदतनीस मिनी अंगणवाडी सेविका म्हणून | | |
| कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असणाऱ्या अनुभवाचा दाखला (असल्यास) | | |
| ९) लहान कुटुंबप्रतिज्ञापत्र | | |
| १०) रेशनकार्ड | | |
| ११) मतदान कार्ड | | |

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की सदर अर्जातील दिलेली माहिती खरी आहे. जर ही माहिती खोटी निघाल्यास माझा अर्ज रदद करण्यात येईल व पुढील कार्यवाहीस मी पात्र असेन याची मला जाणीव आहे..

ठिकाण :– उमेदवाराचे नांव.................................
दिनांक :– स्वाक्षरी ..........................

**परिशिष्ट**
**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार**
**अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**
**प्रतिज्ञापत्र**
**नमुना–ब**
**(नियम ४ पहा)**

मी, श्रीमती...........................................................................
श्री. ....................................यांचा यांची मुलगा/मुलगी पत्नी, वय.............वर्ष.
राहणार ...........................................या द्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करते की वर्षे
(१) मी ..या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
(२) आज रोजी मला खालीलप्रमाणे अपत्य (मुले/मुली) आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्य (मुले/मुली) संख्या ..................... आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा.)

| अं.. | अपत्य (मुलाचे/मुलीचे) नांव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

(३) हयात असलेल्य अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोनापेक्षा अधिक अपत्य झाल्यास, मानधनी पदासाठी मी अपात्र ठरविण्यास किंवा कामावरुन कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण:– उमेदवाराचे नांव
दिनांक :– विमाका/कोवि/२०२४–२५/२८ स्वाक्षरी

# पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती प्रदर्शनास ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे (गणेश भोईटे) : पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करताना नागरिकांना पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती तसेच सजावटीचे साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी ठाणे महानगरपालिकेने आयोजित केलेल्या पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती प्रदर्शनास ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ठामपा शाळा क्र. १९, विष्णुनगर, नौपाडा येथे आयोजित केलेल्या हे प्रदर्शन ०४ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहे.



खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते व आमदार संजय केळकर यांच्या उपस्थितीत शनिवारी (२७ जुलै) या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपआयुक्त अनघा कदम, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान सहाय्यक आयुक्त सोपान भाईक यांच्यासह पर्यावरण कार्यकर्ते व प्रदुषण नियंत्रण विभागाचे कर्मचारी, पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. शहरात प्रभावीपणे पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पना राबविताना नागरिकांनी पर्यावरणस्नेही सजावटीचे साहित्य पाहता यावे व सुलभ खरेदी करता यावे हा या प्रदर्शनाचा उदात्त हेतू आहे.

शाडू माती, लाल माती व गायीचे शेण, पुठ्ठ्याचा लगदा, शेतातील माती व झाडपाल्यापासून तयार करण्यात आलेल्या सुबक गणेशमूर्ती हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण आहे. या व्यतिरिक्त चटईपासून बनविलेले सजावटीची साहित्य, पर्यावरणस्नेही मखर, कापडी मंडप झालर, फायबरपासून तयार केलेले चलचित्रे या प्रदर्शनात नागरिकांना खरेदी करता येणार असून एकूण २५ स्टॉल या ठिकाणी उभारण्यात आले आहेत. या प्रदर्शनास नागरिकांनी भेट देवून हा उपक्रम यशस्वी करावा, तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचा वापर टाळून पर्यावरणस्नेही मूर्ती व सजावटीच्या साहित्याचा वापर करुन जलप्रदुषण रोखण्यास पालिकेस सहकार्य करावे असे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## १३ ऑगस्ट रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

नवी मुंबई : कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

सदर पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे महेंद्र बेलदार,तहसिलदार,(सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

## 'भव्य चित्रकला स्पर्धा' जाणीव एक सामाजिक संस्थेच्यावतीने आयोजन

पनवेल : पनवेल विधानसभेचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जाणीव एक सामाजिक संस्था, पनवेलच्या वतीने शनिवार दिनांक ०३ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत पनवेल शहरातील आगरी समाज हॉल येथे 'भव्य चित्रकला स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.

ज्युनिअर के.जी. ते पहिली, इयत्ता दुसरी ते चौथी, इयत्ता पाचवी ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी पर्यंत अशा चार गटात हि स्पर्धा होणार आहे. नाव नोंदणीची अंतिम तारीख ३० जुलै असून स्पर्धेचे साहित्य (कंपास पेटी, पेन्सील, कलर ई.) प्रत्येक स्पर्धकाने स्वतःचे आणावे. स्पर्धकाला स्पर्धेच्या ठिकाणी चित्रकला पेपर व चित्राचा विषय देण्यात येणार असून प्रत्येक सहभागी स्पर्धकाला प्रमाणपत्र व भेटवस्तु तसेच विजेत्या स्पर्धकाला मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व आकर्षक बक्षिस देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी प्रसाद कंधारे - ८४५१८४२९१९, महेश सरदेसाई- ८४५४०४२९१९, प्रसाद हनुमंते- ७६६६३२७००९, परेश बोरकर- ९९८७३३१९९८,शैलेशकदम-९३२०२०९९९१, राजा चव्हाण- ९९८७३३२२१३, सचिन नाझरे- ९८१९६७६५१८ किंवा विनीत मढवी- ७५०६५७८१९३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन स्पर्धेचे आयोजक व जाणीव एक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस, माजी नगरसेवक नितीन जयराम पाटील यांनी केले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर

## काँग्रेसचा ब्लॉकस्तरीय आढावा बैठकांचा धडाका सुरु

ठाणे : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशान्वये ठाणे शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने ठाणे शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महापालिका हद्दीत ब्लॉकस्तरीय आढवा बैठकांचा धडाका सुरु केला आहे. रविवारी ठाणे महापालिका ब्लॉक क्रमांक १ आणि २ मधील पदाधिकारी, कार्यकर्ता यांची बैठक महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, सहप्रभारी चंद्रकांत पाटील, महाराष्ट्र प्रदेश सचिव, सहप्रभारी संतोष केणी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.




प्रदेश पदाधिकारी भालचंद्र महाडिक, निशिकांत कोळी, माजी नगरसेविका शितल आहेर, रमेश इंदिसे, ज्येष्ठ नेते राम भोसले, बाबा शिंदे, धर्मवीर मेहरोल, युवक काँग्रेसचे आशिष गिरी, मागासवर्गीय सेलचे अध्यक्ष उमेश कांबळे यांच्यासह ब्लॉक क्र. १ चे अध्यक्ष श्रीकांत गाडीलकर, ब्लॉक क्र. २ चे अध्यक्ष आनंद सांगळे यांच्यासह सेल/विभाग अध्यक्ष व ब्लॉक मधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चंद्रकांत पाटील, संतोष केणी आणि विक्रांत चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

एनआरआय पोलिसांचा शोध सुरु

## शहाबाज दुर्घटनाग्रस्त इमारतीचा विकासक व जागा मालक फरार

नवी मुंबई : नवी मुंबई शहरातील बेलापूर विभागात शहाबाज गावात शनिवारी इंदिरा निवास ही बेकायदा अनधिकृत इमारत कोसळून शनिवारी झालेल्या दुर्घटनेत तीन जणांचा बळी गेला. याच इमारतीच्या विकासकाने दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या काही अंतरावरच बेकायदा ७ गाळे उभारले होते त्याच्यावरही पालिकेने तोडक कारवाई केली असून दुसरीकडे या इमारतीचा विकासक महेश कुंभार व जागा मालक शरद वाघमारे दोघेही फरार असून एनआरआय पोलीस मागील तीन दिवसापासून त्यांचा शोध घेत आहेत.

शनिवारी नवी मुंबईतील शहाबाज गावात दुर्घटना झालेल्या इमारतीत मधील ५२ जण सुखरूप बाहेर पडले तर ३ जणांचा मृत्यू झाला होता. सलग तिसऱ्या दिवशीही सकाळपासूनच महापालिकेमार्फत दुर्घटनाग्रस्त इमारतीचा मलबा हटवण्याचे काम महापालिकेचे उपायुक्त सोमनाथ पोटरे व बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल यांच्या नियंत्रणात सुरू आहे. दुर्घटनाग्रस्त इमारतीत अनेकांचा संसार ढिगाऱ्याखाली गेल्यामुळे दुर्घटनाग्रस्त नागरिक दररोज घटनास्थळी उपस्थित राहून आपली कागदपत्रे मिळतील या आशेने उपस्थित राहत आहेत. नवी मुंबई महापालिका अग्निशमन विभागाच्या मदतीने मलबा बाहेर काढण्याचे काम करण्यात येत आहे. दुर्घटनाग्रस्त अनेक नागरिकांनी आपल्या नातेवाईकांच्या तसेच नवी मुंबई महापालिकेच्या रात्र बेलापूर येथील निवारा केंद्रात आसरा घेतला आहे.

दुसरीकडे शनिवारी घडलेल्या दुर्घटनेत बेकायदा इमारतीचा विकासक महेश कुंभार व जमीन मालक यांच्यावर एनआरआय पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी सकाळी याच दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या शेजारीच गुन्हा दाखल झालेल्या विकासकाने ७ बेकायदा गाळे बांधले होते त्याच्यावरही पालिकेने रविवारी तोडक कारवाई केली आहे. परंतू या घटनेतील विकासक व जागा मालक फरार झाल्यामुळे पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

> शहाबाज गावातील दुर्घटनेतील चार मजली इमारत अनधिकृत असून इमारतीला महापालिकेच्या वतीने २००९ मध्येच नोटीस बजावण्यात आली होती . याच दुर्घटनाग्रस्त इमारतीचा विकासक व जमीन मालक याच्याविरोधात एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकासकाने ७ बेकायदा व्यवसायिक गाळे उभारले होते त्याच्यावरही तोडक कारवाई करण्यात आली आहे. सलग तिसऱ्या दिवशीही दुर्घटनाग्रस्त इमारतीचा मलबा उचलण्याचे काम सुरु आहे.
>
> – शशिकांत तांडेल,
> अतिरिक्त आयुक्त, बेलापूर विभाग

> शहाबाज गावातील इमारत दुर्घटना प्रकरणात विकासक व जागा मालक यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला असून ते दोघेही फरार असून त्यांचा शोध पोलीसांमार्फत घेण्यात येत आहे.
>
> –सतीश कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
> एनआरआय पोलीस स्टेशन

## निळजे ते लोढा संकुल दरम्यानच्या बोगद्यातील पाण्याने प्रवासी त्रस्त

डोंबिवली : कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील निळजे गाव हद्दीत रेल्वे प्रशासनाने निळजे ते लोढा गृहसंकुल दरम्यान एक बोगदा नागरिकांना येण्या जाण्यासाठी बांधून दिला आहे. या बोगद्यात पाऊस सुरू झाल्यापासून पाणी तुंबत आहे. मुसळधार पाऊस असला की या बोगद्यात कंबरभर पाणी असते. त्यामुळे निळजे गावातील ग्रामस्थ, विद्यार्थी, महिलांचे हाल होत आहेत.

निळजे गावातील ग्रामस्थांचे बहुतांशी व्यवहार लोढा गृहसंकुल भागात आहेत. या गावातील बहुतांशी मुले लोढा गृहसंकुल परिसरातील शाळांमध्ये, खासगी शिकवणीसाठी, तसेच रहिवासी बाजारपेठेसाठी याच भागात जातात. मध्य रेल्वेने निळजे गावाजवळील लोढा गृहसंकुलकडे जाणारे रेल्वे फाटक दोन महिन्यापूर्वी बंद केले. हे फाटक बंद करण्यापूर्वी फाटक भागात भुयारी मार्ग बांधून देण्याची मागणी निळजे ग्रामस्थांनी मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडे केली होती. अधिकाऱ्यांनी ती मागणी मान्य केली होती. परंतु, एक दिवस रेल्वेने निळजे गावाजवळील रेल्वे फाटक ग्रामस्थांच्या भुयारी मार्गाची पूर्तता न करता रेल्वेने बंद केले. निळजे गावातून रेल्वे फाटकातून गेले की लोढा हेवन गृहसंकुल कमी अंतरावर होते. त्यामुळे ग्रामस्थ याच मार्गाला सर्वाधिक प्राधान्य देत होते.

रेल्वे फाटक बंद केल्याने ग्रामस्थांना सोयीचे होणार नाही अशा पध्दतीने रेल्वेने एका बोगदा बांधला आहे. हा बोगदा सखल आणि खोलगट भागात आहे. या बोगद्यातून निळजे ग्रामस्थांना लोढा हेवन भागात जाता येते. या बोगद्यात पाऊस सुरू झाल्यापासून पाणी तुंबते. हे पाणी जाण्यासाठी या भागात गटार किंवा अन्य कोणतीही सोय नाही. त्यामुळे बोगद्यात पाणी तुंबून राहते. या बोगद्यातून प्रवाशांची वर्दळ असते. त्याच बरोबर मोटारी, लहान मालवाहू वाहने याच बोगद्यातून धावतात. त्यामुळे बोगद्यात पाऊस नसला की चिखल होतो. आणि पाऊस सुरू असला की बोगद्यात पाणी तुंबते. मुसळधार पावसात कंबरभर पाणी साचते. त्यामुळे ग्रामस्थांना या भागातून जाणे मुश्किल होते.

मुलांना लोढा हेवन भागातील शाळेत सोडण्यासाठी जाणाऱ्या महिला, मुलांचे या बोगद्यातील पाणी तुंबण्याचा सर्वाधिक त्रास होतो. ग्रामस्थांना विश्वासात न घेता घाईघाईने हा बोगदा बांधला आहे, अशा तक्रारी ग्रामस्थांनी केल्या. गावापासून दूर अंतरावर हा बोगदा आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळेत या बोगद्यातून येणे धोकादायक आहे. रात्रीच्या वेळेत निळजे ग्रामस्थांची, नोकरदाररांची मोठी अडचण होते.

निळजे गावातून बाहेर पडण्यासाठी रेल्वे फाटक हा एक मधला मार्ग होता. तोच रेल्वेने बंद केल्याने ग्रामस्थांचे खूल हाल सुरू आहेत. ग्रामस्थांना पाणी तुंबलेल्या बोगद्यातून सध्या प्रवास करावा लागतो.

मा. नगरसेविका अनिता गौरी यांच्या सहकार्याने प्रभागातील

## वाढत्या चोऱ्या व सायबर गुन्ह्या संदर्भात पोलिसांकडून चर्चासत्र

कळवा : मा.नगरसेविका अनिता सुनील गौरी यांच्यातर्फे प्रभागात होणार्या वाढत्या चोऱ्या व सायबर गुन्हे यांना आळा घालण्यासाठी नागरिकांसाठी मार्गदर्शन मिटिंगचे आयोजन पारसिक नगर येथील केशव हाईट्स क्लब हाऊस येथे करण्यात आले होते.





या कार्यक्रमास मार्गदर्शनासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक रावजी उतेकर, सायबर पोलीस निरीक्षक प्रदीप सरफरे, मंगलसिंग चव्हाण सहाय्यक पोलीस निरीक्षक सायबर गुन्हा शाखा पोलीस निरीक्षक गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक सांगवे उपस्थित होते. त्याप्रसंगी नागरिकांशी संवाद साधताना महिलांनी लग्नसराई कार्यक्रमाला जाताना आपल्या दागिनाची काळजी घेणे व पहाटेच्या वेळी जॉगिंग करताना सोन्याची दागिने घालू नये तसेच ज्येष्ठ नागरिकांनी बँक व्यवहार करताना आणि अनोख्या व्यक्तीपासून कसे दूर राहावे तसेच चोरांपासून आपल्या सोसायटीतील येणाऱ्या व्यक्तीची उदाहरणार्थ सेल्समन फेरीवाले यांची चौकशी करणे महत्त्वाच्या आहे व आपण कामानिमित्त बाहेर जाताना किंवा गावी जाताना घरातील महत्त्वाचे दागिने पैसा शक्यतो बँकेच्या लॉकरमध्ये ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. तर आपला घर सुरक्षित राहू शकतो, अशी माहिती अशोक उतेकर यांनी दिली. सायबर गुन्हा संदर्भात बोलताना प्रदीप सरफेर म्हणाले की, सोशल मीडियाच्या माध्यमातून सायबर गुन्ह्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक होत आहे. फेसबुक लिंक ओटीपी बँकेचा अकाउंट हॅक करणे अनोळखी व्यक्ती फोन करून वेगवेगळ्या कारणाद्वारे आपली माहिती मागतात असे घडल्यास काय करावे व सायबर गुन्हा घडू नये म्हणून काय दक्षता घ्यावी याबद्दल उदाहरणे देऊन त्यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. त्याप्रसंगी समाजसेवक नरेश गौरी, मा. विभागप्रमुख नंदकुमार पाटील, जन स्वराज संस्थेचे अध्यक्ष राजन पाटील, समाजसेवक अशोक गौरी, सुनील गौरी व प्रभागातील नागरिक या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यामधील काही व्यक्तींनी त्यांच्या बाबतीत घडलेले प्रसंग येथे मांडले. ज्येष्ठ नागरिकांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील मिळाली अशा प्रकारे या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास सूत्रसंचालन राजेंद्र जाधव यांनी केले.

## खारघरमध्ये सराफाच्या दुकानात शिरुन लूट

पनवेल : खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ ई मधील बी. एम. ज्वेलर्स या सराफाच्या दुकानात रविवारी रात्री १० वाजता तीन चोरांनी रिव्हॉल्व्हर घेऊन सोन्याचे चांदीचे लाखो रुपयांचे दागिने लुटून नेले. ही सर्व घटना सराफाच्या दुकानातील सीसीटिव्हीमध्ये कैद झाली आहे. सराफ दुकानदाराने सायरन वाजवून मदत मागण्याचा प्रयत्न केला तरी कोणतीही मदत मिळाली नाही. परंतू सायरनच्या धाकेमुळे अवघ्या दोन मिनिटांत चोरट्यांनी हाताल लागेल तेवढे दागीने घेऊन चोरांचे त्रिकुट दुचाकीवर बसून पसार झाले.

खारघरमधील बी. एम. ज्वेलर्समध्ये हेल्मेट व रेनकोट घालून चोरटे सराफाच्या दूकानात दहा वाजता शिरले. हातामध्ये रिव्हॉल्व्हर डोक्यात हेल्मेट असल्याने सराफ दुकानातील तिघेही दुकानदार घाबरले. ज्या चोराच्या हातामध्ये रिव्हॉल्व्हर होती त्याने दुकानात शिरल्यावर पहिल्यांदा दुकानात हवेत गोळीबार केला. या दरम्यान एका दुकानदाराने सायरन वाजविण्याचा प्रयत्न केला. या सायरनच्या आवाजामुळे दूकानाबाहेरील रहिवाशांचे लक्ष दुकानाकडे वेधले. अनेक रहिवाशांनी स्वतःजवळील मोबाईल फोनमध्ये सराफ दुकानात सुरू असणारा थरार कैद केला. तर अनेकांनी चोर चोर असा आरडाओरडा करुन रहिवाशांनी मदतीसाठी बोलावले. पोलीस नियंत्रण कक्षाकडे मदतीसाठी फोन करण्यात आला. या दरम्यान दुकानातील इतर दोन चोरट्यांनी दुकानातील काचेमध्ये ठेवलेले दागिने काढण्यासाठी दुकानातील काचा फोडण्याची सुरुवात केली. अवघ्या दोन मिनिटांत हा सर्व लुटीचा थरार झाला. हाताला जेवढा लुटीचा माल मिळेल तेवढा घेऊन चोरटे दुचाकीवर बसून पसार झाले. चोरट्यांनी दुकानाबाहेर कोणी पकडू नये म्हणून त्यांच्या हातामधील रिव्हॉल्व्हरने हवेत गोळीबार केला. मागील काही दिवसात महिलांवरील अत्याचार व खून, सराफाची लुटमार, गावात रात्रीची फिरणारी चोरांची टोळी यामुळे पोलीसांसमोर चोरट्यांनी आव्हान उभे ठाकले आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पोलीस दलात आधुनिकता आणली मात्र रस्त्यांवर होणारे गुन्हे तातडीने थांबविणे हे पोलीस आयुक्तांसमोर मोठे आव्हान आहे.

## यशश्री शिंदे आणि अक्षता म्हात्रे यांच्या हत्येप्रकरणी पनवेलमध्ये काढण्यात आला आक्रोश मोर्चा

पनवेल : उरण येथील यशश्री शिंदे आणि नवी मुंबई येथील अक्षता म्हात्रे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी २९ जुलै रोजी पनवेलमध्ये सर्वपक्षीय तसेच समाजातील विविध सामाजिक संघटना तसेच शालेय विद्यार्थींनी यांनी एकत्रित येवून आक्रोश मोर्चा काढला. यावेळी या दोन्ही घटनांमधील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी असे निवेदन प्रांत कार्यालयातील नायब तहसीलदार यांच्याकडे देण्यात आले. पाऊस पडत असताना देखील पावसाची तमा न बाळगता मोर्चा सावरकर चौकातून प्रांत कार्यालयावर नेण्यात आला. उरण शहरातील यशश्री शिंदे या तरुणीची निर्घृण हत्या झाल्याच्या निषेधार्थ त्याचप्रमाणे नवी मुंबई येथील अक्षता म्हात्रे यांच्यावर झालेल्या अत्याचार व हत्येविरोधात पनवेल शहरातील सावरकर चौक येथे पनवेल परिसरातील विविध



राजकीय पक्षाच्या महिला आघाडी तसेच विविध सामाजिक संघटना व शालेय विद्यार्थ्यांनी एकत्रित येवून जनआक्रोश मोर्चा काढला होता. या मोर्चामध्ये पनवेल महापालिकेचे मा.विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह महिला आघाडीच्या कल्पना पाटील, रेवती सकपाळ, प्रमिला कुरघोडे, अर्चना कुळकर्णी, माजी नगरसेविका अनुराधा ठोकळ, प्रिती जॉर्ज, निर्मला म्हात्रे, विद्या चव्हाण, शशिकला सिंह, माधुरी गोसावी, सुदाम पाटील, हेमराज म्हात्रे, अच्युत मनोरे, गणेश कडू, प्रवीण जाधव, लतिफ शेख आदींसह मोठ्या संख्येने पनवेलवासिय या मोर्चात सहभागी झाले होते. व त्यांनी दोषींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे त्यासाठी हा खटला फास्ट ट्रॅक वर चालविण्यात यावा, अशी मागणी शासनाकडे केली आहे. यातील आरोपींना आमच्या ताब्यात द्या आम्ही त्याला तशीच सजा देतो असे आक्रोश मोर्चातील महिलांनी सांगितले. यावेळी नको आम्हाला दीड हजार, महिलांना द्या सुरक्षेचा आधार या घोषणांनी परिसर दणाणला होता. आज शहरामध्ये महिला सुरक्षित नाही त्यामुळे शासनाने कायदे कडक करणे गरजेचे आहे आणि अशा घटना थांबवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. या गुन्ह्यातील आरोपींना भर चौकात फाशी द्यायला हवी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

> असे गुन्हे घडायला नाही पाहिजेत. यातील आरोपींना भर चौकात फाशी दिली पाहिजे. तरच असे कृत्य थांबतील. लवकरात लवकर यातील आरोपींना फाशी द्यावी.
>
> **–प्रीतम म्हात्रे,**
> माजी विरोधी पक्षनेते, पनवेल




'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१